**--- अश्रू ---**

उमटले,
घायाळ स्वप्न
रात्रीचे,
धाऊन आले,
अश्रू
सांत्वनाचे !
उमटले,
अभिमान मातेचे,
धाऊन आले,
अश्रू
गर्वाचे!
उमटले,
दुखं हृदयाचे,
धाऊन आले,
अश्रू
वियोगाचे!
उमटले
मृत्यू देहाचे,
धाऊन आले,
अश्रू,
आप्तजनांचे!

**- विजय जोशी**